# श्री समर्थांचे आनंदवनभुवन

सर्वच संत आपापल्या परीने समाजाभिमुख आहेत. समर्थांनी मात्र समाज जीवनाच्या सर्व अंगांचा अभ्यासपूर्ण विचार मांडला आहे. त्यांचा पिंड , बाल वयात आलेले मोगलाईचे अनुभव (जांब) व उत्तरेकडील तीर्थयात्रेत पाहिलेली अस्मानी-सुलतानी ह्यांचा परिणाम म्हणून त्यांच्या कार्याला स्पष्ट सामाजिक व राजकीय आयाम लाभला. छत्रपती शिवरायांच्या दैदीप्यमान कारकिर्दीमुळे समर्थांना व सर्व समाजाला आशेचा तेजस्वी प्रकाश दिसू लागला. त्या प्रकाशात समर्थांनी आनंदवनभुवनाचे अर्थपूर्ण, विचारपूरणव रमणीय स्वप्न पाहिले. त्या स्वप्नात प्रत्यक्ष व अपेक्षा ह्यांचे मनोहर मिश्रण आहे. प्रत्यक्षावर आधारलेल्या अपेक्षा आहेत. केवळ स्वप्नरंजन नाही. गंगेकाठच्या प्रसिद्ध व महान तीर्थक्षेत्र असलेल्या काशीच्या पार्श्वभूमीवर हे स्वप्न चितारले आहे. पण समर्थांच्या ह्या चित्रात केवळ स्नान, अर्घ्य, दान, पुण्यप्राप्ती, शास्त्राभ्यास इत्यादी पारंपारिक प्रकारांचा समावेश नाही. त्या तीर्थक्षेत्रामध्ये ते रणक्षेत्रही पाहतात! धर्मक्षेत्र व कुरुक्षेत्रही पाहतात. आशीर्वाद व वरदान देणारे देव न पाहता ते देवांच्या फौजा बघतात. दुष्टदुर्जनांची सामूहिक कत्तल झालेली त्यांना दिसते. काशी हे आनंदवनभुवन ह्या क्षेत्रापुरते मर्यादित न राहता देशव्यापी व्हावे ही त्यांची अपेक्षा आहे. सर्व देशाचे दैन्य , पारतंत्र्य, अन्याय व शोषण नष्ट होऊन त्याला आनंदवनभुवनाचे सौभाग्य लाभावे , अशी त्यांची तळमळ आहे.

एकोणसाठ श्लोकांच्या ह्या रचनेत पहिले सहा श्लोक मानवी जीवनातील दु:खे सांगणारे असून त्यांच्या निवारणासाठी पारंपारिक पद्धतीने काशीत वास्तव्य करण्यास सुचविले आहे. सातव्या श्लोकापासून सत्तेचाळीसाव्यापर्यंत एक अद्भुत स्वप्न शब्दबद्ध केले असून शेवटच्या बारा श्लोकांत गाडी पुन्हा पारंपारिक रुळावर आलो आहे! परंपरा न मोडता हिंदू समाजाला खडबडून जाग आणण्याचे व प्रतिकाराला उभे करण्याचे समर्थांचे कौशल्य अद्भुत आहे.

**जन्म दु:खे जरा दु:खे | नित्य दु:खे पुन: पुन: |**
**संसार त्यागणे जाणे | आनंदवनभुवनी || १ ||**

जन्ममरणाच्या चक्रात फिरत असताना प्रत्येक वेळी जन्माला येताना यातना होतात. (दा.बो. ३-१) नंतर म्हातारपणीही दु:खे अनिवार्यपणे कमी जास्त प्रमाणात होतात. (दा.बो. ३-५-३३ ते ५३) शिवाय अध्यात्मिकादी तापही पुन्हा पुन्हा वाट्याला येतात. अशा संस्काराचा जर कायमच त्याग करावयाचा असेल तर काशीक्षेत्रात मरण येईपर्यंत राहावे. ह्या मरणानंतर मोक्ष मिळतो.

**वेधले चित्त जाणावे | राम वेधी निरंतरी |**
**रागे हो वीत हो | आनंदवनभुवनी || २ ||**

आयुष्यभर चित्ताने घेतलेले वेध जाणून किंवा लक्षात घेऊन काशीक्षेत्रात मात्र त्याला सतत रामाचा वेध घेण्यास लावावे. तुम्ही प्रपंचात आसक्त असा की विरक्त असा , तेथे मात्र त्याला अंत:करणवृत्ती रामाकार ठेवण्याचा अभ्यास करावा.

**संसार वोढीता दु:खे | ज्याचे त्यासचि ठाउके |**
**परंतु येकदा जावे | आनंदवनभुवनी || ३ ||**

संसाराचा गाडा ओढत असताना ज्या व्यथा व वेदना होतात त्या ज्याच्या त्यालाचा कळतात. बाहेरून सर्व ठाकठीक दिसते. ह्या संसारातून वेळ काढून एकदा तरी काशीयात्रा अवश्य करावी.

**न सोसे दु:ख ते होते | दु:ख शोक परोपरी |**
**येकाकी एकदा जावे | आनंदवनभुवनी ४ ||**

संसारात असह्य दु:खे वाट्याला येऊन त्या प्रत्येक दु:खाचे शोकात पर्यावसान होते. म्हणून एकदा तरी एकट्यानेच काशीत राहून अध्यात्म श्रवण करीत विश्वेश्वराची दीर्घकाळ उपासना करावी.

**कष्टलो कष्टलो देवा | पुरे संसार जाहला |**
**देह त्यागास येणे हो | आनंदवनभुवनी || ५ ||**

संसारातील ताप असह्य झाल्यावर अनुताप झालेला भक्त देवाची करुणा भाकतो व आता हे जन्ममरणाचे चक्र थांबवण्याची प्रार्थना करतो. त्याने मरणासाठी काशीला यावे.

**जन्म ते सोसिले मोठे | अपाय बहुतापरी |**
**उपाये धाडिले देवे | आनंदवनभुवनी || ६ ||**

त्या भक्ताने कित्येक जन्मांत नाना प्रकारची दु:खे सोसलेली असतात. त्यांचे कायमचे निवारण होण्यासाठी भगवान शंकरांनी काशीक्षेत्रात अनेक उपायांची व्यवस्था केली आहे. दान , ताप , उपासना , स्नान , शास्त्रश्रवण , मनन, निदिध्यासनादी सर्वांची उपलब्धी काशीत आहे.

**स्वप्नी जे देखिळे रात्री | ते ते तैसेची होतसे |**
**हिंडता फिरता गेलो | आनंदवनभुवनी || ७ ||**

रात्री गाढ झोपल्यावर जे जे स्वप्नात दिसते ते स्वप्नकाळी प्रत्यक्ष झाल्यासारखे वाटते. अशाच एका स्वप्नात मी सहज फिरता फिरता काशीला गेलो.

**हे साक्ष देखिली दृष्टी | किती कल्लोळ ऊठिले |**
**विघ्नघ्ना प्रार्थिता गेलो | आनंदवनभुवनी || ८ ||**

तसे प्रत्यक्ष पाहिल्यासारखे झाल्यावर मनात विचारांच्या कितीतरी लाटा उसळल्या. काशीला जाताना प्रथम मी श्रीगणेशाची प्रार्थना करून त्या विचारात विघ्ने येऊ नयेत असा आशीर्वाद घेतला.

**स्वधरमाआड जे विघ्ने | ते ते सर्वत्र ऊठिले |**

**लाटिली कुटिली देवे | दापिली कापिली बहू || ९ ||**

काशीस मला दिसले की , स्वधर्मपालनामध्ये जागो जागी विघ्ने आणली जात आहेत. त्या विघ्नकर्त्यांना देवाने भुईसपाट केले. कित्येकांना बदडून , अनेकांना बुकलून बर्याच जणांना कापून काढले.

**विघ्नांच्या ऊठिल्या फौजा | भीम त्यावरि लोटला |**

**घडिली चिडिली रागे | रडविली बडविली बळे || १० ||**

सत्ताधीश. धर्मांधता, आक्रमकता इ अनेक प्रकारच्या विघ्नांच्या रंगाच रांगा लागल्या. त्या सर्वांवर हनुमंत तुटून पडला. अत्यंत क्रोधाने सर्व बळ वापरुन त्याने कित्येकांना कुटले, चिरडले, बदडले व रडावयास लावले.

**हाकिली टाकीली तेणे | आनंदवनभूवनी |**

**हाकबोंब बहू झाली | पुढे खत्तल मांडिले || ११ ||**

हनुमंताने कित्येकांना हाकलून लावले व काहींना मारून टाकले. त्या मुळे शत्रूपक्षात हाहाकार माजला. नंतर तर त्याने आनंदवनभूवनात मोठ्या प्रमाणावर शत्रूंची कत्तल आरंभली.

**खौळले लोक देवांचे | मुख्य देवचि ऊठिला |**
**कळेना कायरे होते | आनंदवनभूवनी || १२ ||**

प्रत्यक्ष इंद्रच युद्धाला उभा राहिल्याने सर्व देवांना रणोत्साह चढला. नंतर आनंदवनभूवनात जे घडले ते वर्णन करण्याच्या पलीकडे होते.

**स्वर्गीची लोटली जेथे | राम गंगा महानदी |**
**तीर्थासी तुळणा नाही | आनंदवनभूवनी || १३ ||**

स्वर्गातून खाली आलेली महानदी गंगा रामनाम घेणार्या भगवान शंकरांच्या जटेतून काशीपर्यंत आली. म्हणून हे तीर्थ अद्वितीय आहे. (गंगेच्या भागीरथी , मंदाकिनी इ. नावांत रामनदीचा समावेश नाही)

**ग्रंथी जे वार्णिले मागे | गुप्तगंगा महानदी |**

**जळात रोकडे प्राणी | आनंदवनभूवनी || १४ ||**

काशीखंडासारख्या ग्रंथात आनंदवनभूवनामध्ये सरस्वती या गुप्त महानदीचा उल्लेख आहे. काशीच्या गंगेतील पाण्यात मोठे मासे, सुसरी इ प्राणी सर्वत्र दिसतात.

**सकळ देवांचिये साक्षी | गुप्त उदंड भुवने |**

**सौख्यासी पावणे जाणे | आनंदवनभूवनी || १५ ||**

सर्व देवांच्या खुणांसाठी काशीक्षेत्रात कित्येक गुप्त ठिकाणे आहेत. त्यांच्या स्मरणाने व प्रसन्नतेने होणार्याह सुखासाठी काशीला जावे.

**त्रैलोक्य चालले तेथे | देव गंधर्व मानवी |**

**ऋषी, मुनी महायोगी | आनंदवनभूवनी || १६ ||**

तिन्ही लोकांतील (स्वर्ग , मृत्यू , पाताळ ) देव , गंधर्व , मानव, तप करणारे ऋषी , अध्यामविचार करणारे मुनी व योगसाधना करणारे महान योगी, काशीला जातात.

**आक्रा आक्रा बहु आक्रा | काये आक्रा कळेचिना |**

**गुप्त ते गुप्त जाणावे | आनंदवनभूवनी || १७ ||**

अध्यात्माच्या क्षेत्रात काही सांकेतिक संकल्पना जाणीवपूर्वक गुप्त ठेवलेल्या असतात. धोपट अभ्यास करणार्याला त्या उकलत नाहीत. अध्यात्मशास्त्राची वर्मे जाणल्याशिवाय त्यांचे आकलन होत नाही. समर्थ

संप्रदायात अकरा ह्या संख्येचे महत्व ह्या प्रकारचे आहे. अकरा ही संख्या १ पुढे १ किंवा १ मागे १ अशी लिहिली जाते. त्यामुळे त्यांत ऐक्याचा संकेत मिळतो. उदा जीव-शिव , शिव-शक्ती , गुरु-शिष्य , देव-भक्त , सगुण-निर्गुण हे सर्व एक-एक आहेत. त्यांचा भेद गौण असून, ऐक्य मुख्य आहे. ऐक्याचा अनुभव येईपर्यंत भेद मानावा लागतो. समर्थ स्थापित मारुती अकरा , महंताचे गुण अकरा , रुद्र अकरा , वानर सेनापती अकरा, “जय जय रघुवीर समर्थ” ह्या घोषाची अक्षरे अकरा.

**त्रैलोक्य चालील्या फौजा | सौख्य बंद विमोचने |**

**मोहीम मांडली मोठी | आनंदवनभूवनी || १८ ||**

**सुरेश उठिला अंगे | शूरसेना परोपरी |**

**विकटे कर्कशे याने | शस्त्रपाणी महाबळी || १९ ||**

सर्वबल संपन्न असलेल्या शस्त्रधारी इंद्राने स्वत: सर्वप्रकारे सज्ज असलेल्या देवसेनेसह भयानक दिसणार्यार व अतिवेगामुळे कर्कश आवाज करणार्या विमानातून शत्रूवर हल्ले केले किंवा विमानांप्रमाणे वेगवान अस्त्रे सोडली.

**देव देव बहु देव | नाना देव परोपरी |**

**दाटणी जाहली मोठी | आनंदवनभूवनी || २० ||**

ऋग्वेदात देवांची संख्या सांगताना स्वर्गात अकरा , पृथ्वीवर अकरा व अंतरिक्षात अकरा अशा तेहतीस देवांचा उल्लेख आहे. किंवा आठ वस्तू , अकरा रुद्र , बारा आदित्य, एक इंद्र व एक प्रजापती असे तेहतीस देव एकत्र येऊन त्यांनी काशीत मोठी गर्दी केली. लक्ष्यार्थाने सर्व सत् प्रवृत लोकांनी आपले सामर्थ्य एकवटुन जुलूमशाही विरुद्ध लढण्यासाठी आनंदवनभूवन गजबजून टाकले. पुढे समर्थ आणखी देव सांगतात.

**दिक्पती चालले सर्वे | नाना सेना परोपरी |**

**वेष्टित चालले सकळे | आनंदवनभूवनी || २१ ||**

पूर्वीचा इंद्र, दक्षिणेचा यम, उत्तरेचा कुबेर, पश्चिमेचा वरुण इये दिशांचे स्वामी काशीला आले. त्यांनी येताना त्यांचे सैन्य एकत्र करून आणले.

**मंगळे वाजती वाद्दे | महागणा-समागणे |**

**आरंभी चालला पुढे | आनंदवनभूवनी || २२ ||**

**रासभे राखिली मागे | तेणे रागेचि चालला |**

**सर्वत्र पाठिशी फौजा | आनंदवनभूवनी || २३ ||**

रावणाने गणपतीला कैद केल्यावर त्याला गाढवे राखण्याचे काम दिले होते! सज्जनांनी सामर्थ्य वापरले नाही, तर त्यांची दुर्दशा होते ते येथे कळते. रामाने सर्व देवांची सुटका केल्यावर गणपतीच्या मनात तो अपमान घर करून होता. त्यामुळे त्याने संधी मिळताच युद्धात पुढाकार घेऊन आपले गणही बरोबर घेतले. त्यांच्या पाठिशी फौजांच्या भरपूर तुकड्या होत्या. सज्जनांनी दुर्जनांचा प्रतिकार करण्याचे ठरवल्यावर मंगल वाद्दे वाजू लागली. कारण हा एक शुभसंकेत आहे.

**अनेक वाजती वाद्दे | ध्वनी कल्लोळ उठिला |**

**छबिने डोलती ढाला | आनंदवनभूवनी || २४ ||**

अनेक प्रकारची रणवाद्दे वाजू लागल्याने त्यांची जणू प्रचंड लाटच तयार झाली. देवांच्या मिरवणुकीपूढे ढालाईत चालत होते. आनंदवनभूवन असे गजबजून गेले.

**विजई दीघ तो आहे | ते दिघी सर्व उठती |**

**अनर्थ मांडला मोठा | आनंदवनभूवनी || २५ ||**

विजयादशमीच्या विजयी मुहूर्तावर सर्व देव युद्धाला सज्ज झाले व त्यांनी आनंदवनभूवनात अन्यायाविरुद्ध हलकल्लोळ उडवून दिला.

**देवाचि तुष्टला होता | त्याचे भक्तीस भूलला |**

**सांगुता क्षोभला दु:खे | आनंदवनभूवनी || २६ ||**

रावणाच्या भक्तीने प्रसन्न होऊन प्रत्यक्ष महादेवाने त्याला मोठे सामर्थ्य दिले. पण रावणाने केलेले अत्याचार महादेवला सांगितल्यावर त्याला मोठे दु:ख होऊन तो क्षुब्ध झाला.

**कल्पांत मांडिला मोठा | म्लेंच्छ दैत्य बुडावया |**

**कैपक्ष घेतला देवी | आनंदवनभूवनी || २७ ||**

देवांनी गांजलेल्यांची बाजू घेऊन अन्याय करणार्याब मोंगलरूप दैत्यांना नष्ट करण्यासाठी जणू कल्पांत ओढवावा तसा त्यांचा नाश करण्यास आनंदवनभूवनात सुरुवात केली.

**बुडाले सर्वही पापी | हिंदुस्थान बळावाटे |**

**अभक्तांचा क्षयो झाला | आनंदवनभूवनी || २८ ||**

असा नाश झाल्यानंतर हिंदूंच्या राज्यातून त्यांच्या दैवतांचा द्वैष करणार्यांचा मागमूसही न राहिल्याने ते राज्य बलवान झाले. सर्व पापी नष्ट झाले.

**पूर्वी जे मारीले होते | तेचि आंता बळावले |**

**कोपले देव देवांचा | आनंदवनभूवनी || २९ ||**

त्रेतायुगात ज्यांना पराभूत केले होते त्याच राक्षसी प्रवृत्तींना आता जणू पुन्हा बळ मिळाल्याने देवाधिदेव श्रीरामाला क्रोध आला.

**त्रैलोक्य गांजिले मागे | विवेकी ठाउके जना |**

**कैपक्ष घेतला रामे | आनंदवनभूवनी || ३० ||**

त्रेतायुगात रावणाने रक्षसांच्या साहयाने त्रैलोक्याला गांजले होते हे जाणते जाणतातच. आता आनंदवनभूवनात श्रीरामाने गांजलेल्यांच्या बाजूने स्वत:चे सामर्थ्य उभे केले आहे.

**भीमची धाडीला देवे | वैभवे धाव घेतली |**

**लांगुळ चालीले पुढे | आनंदवनभूवनी || ३१ ||**

श्रीरामाने आधुनिक राक्षसांचा नायनाट करणार्यांसाठी हनुमंताची योजना केल्यावर त्याने त्यांच्या पूर्ण सामर्थ्यासह आनंदवनभूवनात धडक मारली. हनुमंताची बलवान पुच्छा त्याच्या पुढे जाताना दिसली.

**येथूनी वाढीला धर्मू | रमाधर्मसमागमे |**

**संतोष मांडला मोठा | आनंदवनभूवनी || ३२ ||**

ह्या पराक्रमानंतर आनंदवनभूवनात रमा म्हणजे लक्ष्मी धर्मपत्नी असलेल्या श्रीविष्णूचे अवतार असलेल्या श्रीरामाचे राज्य स्थापन झाल्यामुळे सर्वत्र आनंदी आनंद झाला.

**बुडाला औरंग्या पापी | म्लेंच्छ संहार जाहला |**

**मोडिली मांडिली क्षेत्रे | आनंदवनभूवनी || ३३ ||**

महापापी औरंगजेबरूप रावणाचा नाश होऊन मोगलांचा संहार झाला. त्यांनी उद्ध्वस्त केलेली हिंदूंची तीर्थक्षेत्रे पुन्हा उभारली गेली.

**बुडाले भेदवाही ते | नष्ट चांडाळ पातकी |**

**ताडिले पाडिले देवे | आनंदवनभूवनी || ३४ ||**

अत्यंत दुष्ट, नीच व पापी असलेल्या घरभेद्यांचे किंवा फितुरांचे सर्वस्व बुडाले. त्यांना श्रीरामाने भरपूर बडवून रणांगणात पाडले.

**गळाले, पळाले, मेले | जाले देशधडी पुढे |**

**निर्मळ जाहली पृथ्वी | आनंदवनभूवनी || ३५ ||**

काही घरभेद्यांचे अवसान गळाले, काही पळून गेले तर काही मेले , काही देशोधडीला लागले. त्यामुळे पृथ्वीवरचा भारत देश स्वच्छ झाला!

**उदंड जाहले पाणी | स्नानसंध्या करावया |**

**जप-तप अनुष्ठाने | आनंदवनभूवनी || ३६ ||**

ह्या पावन देशातील नद्या, तलाव, व सरोवरांचे पाणी स्नानसंध्या, जप , तप व अनुष्ठानादी धर्मकृत्ये करण्यासाठी मोकळे झाले. वैदिक धर्माच्या कर्मकांडाला होणारे अडथळे संपले. तीर्थक्षेत्रे खुली झाली.

**नाना तपे पुरश्चरणे | नाना धर्म परोपरी |**

**गाजली भक्ति हे मोठी | आनंदवनभूवनी || ३७ ||**

कायिकादी अनेक तपे , गायत्र्यादी पुरश्चरणे , चारही आश्रमांतील विहित धर्म ह्यांचे जणू पूर्ण पुनर्वसन झाले. शिवाय श्रीरामाच्या भक्तीचा काशीस डंका झडू लागला.

**लिहिला प्रत्ययो आला | मोठा आनंद जाहला |**

**चढता वाढता प्रेमा | आनंदवनभूवनी || ३८ ||**

जो अनुभव स्वप्नात आला तो मी लिहिला. श्रीरामांविषयी वाढते चढते प्रेम पाहून मला फार आनंद झाला .

**बंड पाषाण्ड उडाले | शुद्ध अध्यात्म वाढले |**

**रामकर्ता रामभोक्ता | आनंदवनभूवनी || ३९ ||**

हिंदुधर्माविरुद्ध होणारे अत्याचार व वेदविरोधी मते फोलकटाप्रमाणे उडून जाऊन प्रस्थानत्रयीत संगीतलेले शुद्ध, अध्यात्मशास्त्र प्रस्थापित होऊन वाढीला लागले. कर्ता-भोक्ता सर्व काही श्रीराम आहे. असा आनंदवनभूवनातील सर्वांचा निश्चय झाला.

**देवालये दीपमाळ | रंगमाळा बहुविधा |**

**पूजिला दे देवांचा | आनंदवनभूवनी || ४० ||**

काशीक्षेत्रातील महादेवाची सर्व मंदिरे दीपमाळा व अनेक प्रकारच्या रंगीत फुलांनी सजविली व देवाची यथाविधी पूजाअर्चा सुरू झाली.

**रामवरदायिनी माता | गर्द घेउनि ऊठिली |**

**मर्दिले पूर्वीचे पापी | आनंदवनभूवनी || ४१ ||**

रामाला विजयाचे वरदान देणार्या देवीने आपले स्थान सोडून हातात गदा घेऊन बराच काळ धुडगूस घालणार्यां पाप्यांना ठार मारले.

**प्रत्यक्ष चालिली रामा | मूळमाया समागमे |**

**नष्ट चांडाळ ते खाया | आनंदवनभूवनी || ४२ ||**

मूळमाया हे जिचे अव्यक्त रूप आहे ती देवरुपात व्यक्त होऊन रामराजांच्या बरोबरीने दुष्ट व नीच यांचा समाचार घेण्यास सिद्ध झाली. शक्तीरूपाने सहाय्यकारी झाली.

**भक्तासी रक्षिले मागे | आताहि रक्षिते पहा |**

**भक्ताची दिधले सर्वे | आनंदवनभूवनी || ४३ ||**

त्या देवी मातेने भक्तांचे पूर्वीपासूनच रक्षण केले आहे. ती आजही आनंदवनभूवनातील भक्तांना , शक्ती , मुक्ती इये सर्व देत आहे.

**आरोग्य जाहली काया | वैभव सांडिली सीमा |**

**सारसर्वस्व देवांचे | आनंदवनभूवनी || ४४ ||**

**देव सर्वस्वी भक्तांचा | देव भक्त दुजे नसे |**

**संदेह तुटला मोठा | आनंदवनभूवनी || ४५ ||**

**देवभक्त एक झाले | मिळाले जीव सर्वही |**

**संतोष पावले तेणे | आनंदवनभूवनी || ४६ ||**

**समर्थ्ये येश कीर्तीची | प्रतापे सांडिली सीमा |**

**सारसर्वस्व देवांचे | आनंदवनभूवनी || ४७ ||**

वरील चार ओव्यांच्या गटात देवाचे सारसर्वस्व सांगितलेआहे. आनंदवनभूवनातील देव व भक्त कसे असतात, त्यासंबंधी काही ठळक मुद्दे मांडले आहेत. देवाला भक्ताकडून काय अपेक्षा आहेत, देव व भक्तांचे नाते कसे आहे व देवाकडून भक्ताला काय लाभ होतो , त्याचे वर्णन केले आहे. देवाच्या उपदेशाचे हे सार आहे.

1) व्यायाम, आहार व चित्ताच्या प्रसन्नतेने भक्तांने स्वत:चे शरीर आरोग्यसंपन्न ठेवावे.
2) ‘व्याप तेवढे वैभव ’ ह्या न्यायाने वैभव भरभरून मिळवावे.
3) देव सर्वस्वी भक्तांच्या अधीन राहतो. देव व भक्त यांतील अद्वैतासंबंधीचा मोठा संशय देवाच्या यथार्थ ज्ञानाने नष्ट होतो.
4) सर्व भक्त एक झाले तर देवचेही त्यांच्याशी ऐक्य असल्याने सर्व देवही एक होतात व अशा युतीने अमर्याद यश, किर्ति व सामर्थ्य मिळते. सत्प्रवृत्त भक्तांनी संघटित होण्याची फार आवश्यकता आहे.

**रामकर्ता रामभोक्ता | रामराज्य भूमंडळी |**

**सर्वस्वे मीच देवाचा | देव माझा कसा म्हणो || ४८ ||**

जीव कर्ता व भोक्ता नसून रामच कर्ता व भोक्ता आहे. अशा ईश्वरस्वरूप रामाचे पृथ्वीवर राज्य आहे. जिवरूपाने मी सर्वस्वी राममय असल्याने जिवाने देवाला “माझे” का व कसे म्हणावे?

**हेच शोधोनी पहावे | रहावे निश्चली सदा |**

**सार्थक श्रवणे होते | आनंदवनभूवनी || ४९ ||**

वरील तत्वज्ञान सूक्ष्मपणे समजावून घेऊन साधकाने सतत शांत राहावे. काशीक्षेत्रातील यथार्थ श्रवणाने हे साध्य होऊन जीवनाचे सार्थक होते.

**वेदशास्त्र धर्मचर्चा | पुराणे महात्मे किती |**

**कवित्वे नूतने जीर्णे | आनंदवनभूवनी || ५० ||**

श्रीक्षेत्र काशीमध्ये वेदांतशास्त्र , धर्मशास्त्र , पुराणें ह्यांवर अनेक महात्मे चर्चा करीत असतात. पाठ-पाठणाच्या परंपरा चालू आहेत. उपनिषदादी , प्राचीन वाण्ड्मय व भगवान शंकराचार्यादिकांच्या अर्वाचीन रचना ह्यांचेही अध्ययन येथे चालते.

**गीत संगीत सामर्थे | वाद्द कल्लोळ उठिला |**
**मिळाले सर्व अर्थार्थी | आनंदवनभूवनी || ५१ ||**

श्रीकाशीक्षेत्रात काव्यशास्त्र, संगीतशास्त्र, वाड्यवादनाचे शास्त्र इत्यादींचे शिक्षण समर्थपणे दिले जाते. त्यांचे झंकार सर्वत्र ऐकू येतात. त्यामुळे जो ज्या शास्त्राचा भोक्ता आहे तो काशीक्षेत्रातच येतो.

**वेद तो मंद जाणावा | सिद्ध आनंदवनभूवनी |**

**आतूल महिमा येथे | आनंदवनभूवनी || ५२ ||**

आनंदवनभूवनाचे माहात्म्य अगाध आहे. ह्या क्षेत्रात जीवन्मुक्त सिद्धांचे सतत वास्तव्य असते. त्यांनी वेदांच्या प्रतिपाद्य ब्रह्माचा प्रत्यक्ष अनुभव घेतला असल्याने, वेद त्यांच्यापुढे फिके ठरतात. वेदांना त्यांनी स्वत:च सांगूनही न कळणारे सिद्धांनी जाणलेले असते.

**मनासी प्रचिती आली | शब्दी विश्वास वाटला |**

**कामना पुरती सर्वे | आनंदवनभूवनी || ५३ ||**

स्वप्न पाहत असताना ते प्रत्यक्ष घडत असल्याप्रमाणे दिसल्यामुळे मी रेखाटलेल्या ह्या रचनेतील माझ्या शब्दांविषयी मला विश्वास निर्माण झाला आहे.

(समर्थांच्या निर्वाणानंतर काही वर्षांनी औरंगजेबाचा मृत्यू झाला. संताजी, धनाजी राघोबा, थोरले बाजीराव, चिमणाजी, होळकर इत्यादींनी महान पराक्रम करून मोगलांना ठेचून काढले). त्यामुळे भारतासंबंधी माझ्या इच्छा पूर्ण झाल्या.

**येथूनि वाचती सर्वे | ते ते सर्वत्र देखती |**

**सामर्थ्य काय बोलावे | आनंदवनभूवनी || ५४ ||**

ह्या पराक्रमानंतर आता हिंदू जीवनपद्धतीला सुरक्षितपणा मिळाला. सर्वांना सर्वत्र तो प्रत्यक्ष दिसत आहे. आता सामर्थ्याला काय बारे उणीव राहील?

**उदंड ठेविली नामे | आपस्तुतीच मांडली |**

**ऐसे हे बोलणे नाही | आनंदवनभूवनी || ५५ ||**

**बोलणे वाउगे होते | चालणे पाहिजे बारे |**

**पुढे घडले ते सारे | आनंदवनभूवनी || ५६ ||**

**स्मरले लिहिले आहे | बोलता चालता हरी |**

**काय होईल पाहावे | आनंदवनभूवनी || ५७ ||**

हे माझे लेखन पाहिल्यावर वाचकांनी माझी खूप हेटाळणी, टवाळी केली की, हे सर्व लेखन म्हणजे

स्वत:च स्वत:च्या न केलेल्या पराक्रमांची स्तुति करण्यासारखे आहे. पण हे खरे नाही. आनंदवनभूवनात हे घडणारच आहे. वागणे किंवा अनुभव तसा नसेल तर केवळ बोलणे फुकट जाते. पण मी बोललो आहे तसा नसेल तर केवळ बोलणे फुकट जाते. पण मी बोललो आहे तसा अनुभव पुढे येणार आहे. मला स्वप्न जसे जसे आठवले तसे लिहिले आहे. पण हे पाहणारा, आठवणारा व लिहिणारा श्रीहरीच आहे! त्याचे पाहणे प्रत्यक्षात कसे उतरते ते जरूर पाहावे.

**महिमा तो वर्णवेना | विशेष बहुतापरी |**

**विद्दापीठ ते आहे | आनंदवनभूवनी || ५८ ||**

**सर्व सदया कळा विद्दा | न भूतो न भविष्यती |**

**वैराग्य जाहले सर्वे | आनंदवनभूवनी || ५९ ||**

आनंदवनभूवन हे विद्वेचे माहेरघर आहे. त्यात शिकविल्या जाणार्याद विद्यांचा विशेष महिमा अपार असून त्याचे वर्णन वाणीने करणे शक्य नाही. तेथे प्रचलित असलेल्या सर्व कला विद्यांचे जे शिक्षण दिले जाते ते जगात पूर्वी कधी दिले गेले नाही व दिले जाणार नाही. एवढे असूनही आनंदवनभूवनात वैराग्यवृत्तीचे साम्राज्य आहे.

सर्वधर्मसमभावाच्या विकृत कल्पना अपयशी ठरलेल्या साम्यवादी विचारांची नशा , परिवर्तनाची विधायक दिशा न दाखवता परंपरांचा उपहास , मतपेटीच्या राजकारणासाठी आक्रामक मूलतत्ववाद्दांना अभयदान व उत्तेजन , चंगळवादी पाश्चात्य संस्कृतीच्या समाज पोखरणार्याच अप्रत्यक्ष आक्रमणांकडे दुर्लक्ष, धर्मातील झुंडशाही व अज्ञान , राजकीय व आर्थिक लाभांसाठी सामाजिक विघटनाला उत्तेजन ह्या सर्व कारणांनी समर्थांचे हे स्वप्न प्रत्यक्षात उतरणे , आज अशक्यप्राय दिसत आहे. तरीही सर्व सद्विचारी सज्जन खरोखर एकत्र आल्यास व लोकशाहीच्या चौकटीत त्यांनी आपले सामर्थ्य दाखविल्यास हे स्वप्न पूर्ण होईल. हिंदू, मुसलमान इये धर्म , सर्व जाती , सर्व व्यावसायिक, मजूर , शेतकरी , नोकरदार ह्या सर्वांना सज्जनांची संख्या फार फार मोठी आहे. सज्जनपणा ही कोणाची मिराशी नाही. पण त्यांनी क्रियाशील होऊन सामर्थ्याने चळवळ उभारली पाहिजे.